# शिव

## मनोगत

बहुतेकांना देवाविषयी जे थोडेफार ज्ञान असते, ते बहुधा त्यांनी लहानपणी वाचलेल्या किंवा ऐकलेल्या गोष्टींमुळे असते. अशा अल्प ज्ञानामुळे त्यांचा देवावरचा विश्‍वासही थोडाफारच असतो. देवतांविषयी जास्त ज्ञान मिळाल्यास जास्त विश्‍वास निर्माण होण्यास सहाय्य होते. विश्‍वासाचे रूपांतर पुढे श्रद्धेत झाल्याने देवतेची उपासना अन् साधनाही चांगल्या प्रकारे होते. तसे व्हावे म्हणून या लघुग्रंथात शिवाविषयी इतरत्र बहुधा न दिलेले पण उपयुक्त असे अध्यात्मशास्त्रीय विवेचन करण्यावर विशेष भर दिला आहे. शिवाविषयी सविस्तर विवेचन 'शिव' या ग्रंथात केले आहे. हा लघुग्रंथ वाचून प्रत्येकाला साधनेची स्फूर्ती मिळो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना. – **संकलक.**